Session : 7

Date : 22/09/25

News : Damaji Express

# चंदननगरच्या शाळेत सायबर सुरक्षा सेमिनार



मोहोळ (तालुका प्रतिनिधी) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चंदननगर (लांबोटी) येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ व क्लिक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते.

सध्या अनेक प्रकारे लोकांची ऑनलाईन फसवणूक केली जात आहे. कोणीतरी फोन करतो, मी बँकेतून बोलत आहे म्हणून विश्वासाने आपणास फसवतो. असे होऊ नये म्हणून अश्या चर्चासत्राची आवश्यकता असल्याचे मुख्याध्यापक हमीदिखाँ पठाण यांनी आमच्या प्रतिनिधी शी बोलताना सांगितले.

आपण ऑनलाईन फसवणूकीची शिकार होऊ नये यासाठी कोणती काळजी घ्यावी याविषयी आरती माळी व ऋतुजा गाडे या विद्यार्थीनींनी या विषयावर मार्गदर्शन केले. मोबाईल वर आलेला ओटीपी कोणालाही सांगू नये,अनोळखी मोबाईल नंबर वरून आलेल्या फोन कॉलची पडताळणी करून घ्यावी. व्हॉटसप व इतर सोशल मिडियावर आलेल्या मेसेजेस व लिंकची शहनिशा करूनच पुढील प्रक्रिया करावी असे सांगितले. या कार्यक्रमास मुख्याध्यापक हमीदिखाँ पठाण, रामचंद्र गोफने, विजया मोरे, निर्मला रोकडे, शगुफ्ता शेख, गणेश गावडे, निलम माळी, उर्मिला साखरे, स्वाती शिंदे व विद्यार्थी उपस्थित होते.